# जिल्हाधिकारी कार्यालय, उस्मानाबाद (पुरवठा विभाग)

मेन रोड, उस्मानाबाद ,पिन कोड – ४१३५०१ *दुरध्वनी क्रमांक (०२४७२) २२७३०५*

**email id – dsoosmanabad@gmail.com**


जा.क्र२०२०/पुरवठा/कार्यासन १३/सीआर-७ दिनांक16 डिसेंबर, २०२२

१. अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग शासन निर्णय क्रमांक विल्हेवाट -3018/प्रक्र.64/नापु-1६ अ/दि.10.10.2018

२. अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग शासन निर्णय क्रमांक विल्हेवाट -3018/प्रक्र.64/भाग-२ /नापु-16-अ/दि.०७.१२.२०२१

## // निविदा सुचना //

उस्मानाबाद जिल्हातील खालील १६ शासकिय गोदामातील माहे एप्रिल २०१९ ते मार्च २०२२ उपयोगी,निरूपयोगी व तुकडा बारदान्याची विक्री जेथे आहे तेथून व ज्या स्थितीत आहे या तत्वावर विक्री करावयाचा आहे. त्यासाठी जिल्हाधिकारी उस्मानाबाद हे मोहोरबंद निविदा मागवित आहेत. दिनांक ३१/०३/२०२२ अखेर या कालावधीचा गोदाम निहाय बारदाना खालीलप्रमाणे आहे.

उपयोगी,निरूपयोगी, तुकडा बारदान्याचा माहे मार्च २०२२ अखेर शिल्लक बारदाना अहवाल

| अ.क्र. | तालुक्याचे नाव | गोदामाचे नाव | उपयोगी बारदाना ५० किलो क्षमता प्रति नग | निरूपयोगी बारदाना ५० किलो क्षमता प्रति नग | तुकडा बारदाना वजन क्विंटल मध्ये |
|---|---|---|---|---|---|
| १ | उस्मानाबाद | उस्मानाबाद | २५४ | २४९ | ४.८२ |
| २ | | बेंबळी | २६२ | २५० | ७.९३ |
| ३ | | ढोकी | ३० | २१० | ३.९५ |
| ४ | | तेर | २७ | ४४३ | १२.८१ |
| ५ | तुळजापूर | तुळजापूर | ८१० | ८३९ | ४.८५ |
| ६ | | नळदुर्ग | ४८८ | २१९ | ५.२२ |
| ७ | लोहारा | लोहारा | १६५ | ४२० | ६.४३ |
| ८ | उमरगा | उमरगा | ९९ | १७५ | ११.६५ |
| ९ | | मुरूम | ७६ | ९२६ | ४.५७ |
| १० | कळंब | कळंब | ७२ | ३३३ | ७.७६ |
| ११ | | येरमाळा | ०४ | १०५ | १.०४ |
| १२ | | शिराढोण | ९५ | ८२० | १.६२ |
| १३ | वाशी | वाशी | ३५२ | १४३५ | १.१४ |
| १४ | भुम | भुम | ६०१ | ९३० | ४.३७ |
| १५ | परंडा | परंडा | ११५१ | ६४४ | २.११ |
| १६ | | अनाळा | ७६४ | ४९५ | ३.४१ |
| एकुण | ८ | १६ | ५२५० | ८४९३ | ८४.४८ |

**ज्याना बारदाना विकत घण्याचा आह त्याना निविदा दिनाक ०६/०१/२०२३ पर्यत कार्यालयीन वेळेत सादर कराव्यात. निविदा सोबत रक्कम रू. ५००/- चा DD जिल्हा पुरवठा अधिकारी यांचे नावे जोडावा. अन्यथा निविदा दाखल करून घेतली जाणार नाही.**

**निविदाच्या मोहोरबंद पाकिटावर रिकाम्या बारदान्याची निविदा असे लिहावे.**

**बारदाना हातची किंमत खालीलप्रमाणे आहे -**

| उपयोगी बारदाना | निरूपयोगी बारदाना | तुकडा बारदाना |
|---|---|---|
| ५० किलो प्रति नग दर | ५० किलो प्रति नग दर | प्रति १ कि.ग्र.दर |
| १८.४९ रू | ९.६७ रू | ५.६८ रू |

**निविदेमध्ये दर नमुद करताना ते वरील दिलेल्या हातच्या किंमतीपेक्षा जास्त असावेत.**

2.निविदेतील उपयोगी निरुपयोगी बारदान्याचे दर प्रती बारदाना नग व तुकडा बारदाना प्रति कि.ग्रं. प्रमाणे स्वतंत्र नमुद करावे लागेल. (इसा-याची रक्कम खालीलप्रमाणे आहे.)

| अ.क्र | बारदान्याचा प्रकार | बारदना संख्या /किंटल | **बारदाना हातची किंमत** | एकुण रक्कम | उपयोगी,निरुपयोगी व तुकडा बारदान्याचा एकुण रकमेच्या 2 टक्के प्रमाणे होणारी इसा-याची रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 1. | उपयोगी बारदान्यासाठी 50 कि. | ५२५० | १८.४९ | ९७०७३ | १९४१ |
| 2. | निरुपयोगी बारदान्यासाठी 50कि. | ८४९३ | ९.६७ | ८२१२७ | १६४३ |
| 3. | तुकडा बारदान्यासाठी किंटल | ८४.४८ | ५.६८ | ४७९८५ | ९६० |
| 4. | एकुण | | | २२७१८५ | ४५४४ |

३ .प्रत्येक निविदा धारकास वरील प्रमाणे इसा-याची रक्कम ४५४४ DD व्दारे जिल्हा पुरवठा अधिकारी यांचे नावे भरणा करण्यात यावी .

**निविदा धारकास शासनाच्या मान्यतेला अनुसरून बारदाना खरेदीचा हक्क प्राप्त होईल. निविदा स्विकारण्याचा किंवा कोणतेही कारण न दर्शविता नाकारण्याचा अधिकार व हक्क मा. जिल्हाधिकारी उस्मानाबाद यांनी राखुन ठेवले आहेत.**

| **तपशील** | **दिनांक** |
|---|---|
| दरपत्रके सादर करण्याचा कालावधी | दि 21/12/2022 सकाळी ते<br>दि 06/01/2023 कार्यालयीन वेळेत |
| दरपत्रके भरुन सादर करण्याचा अंतीम दिनांक | दि 06/01/2023 कार्यालयीन वेळेत |
| बंद पाकीट खोलणे व कागदपत्रांची छाननी करणे | दि. 11 /01/2023 सकाळी 11 वाजता |

**दरपत्रकाच्या/निविदेच्या पाकीटावर — बारदाना खरेदी साठी दरपपत्रक/निविदा असे स्पष्ट पणे लिहावे. पाकीट मध्ये दयावयाचे कागदपत्रे**

१ निविदा फी रु. ५००/- अक्षरी पाचशे रुपये जिल्हा पुरवठा अधिकारी यांचे नावे DD
२ निवेदा धारकाचे आधार कार्ड छायांकित प्रत
३ निवेदा धारकाचे पॅन कार्ड छायांकित प्रत
४ संस्था अथवा फर्म असल्यास नोंदनी क्रमांक
५ दरपत्रक
६ अटी व शर्ती मान्य असले बाबतचे रुपये १०० च्या बाँड वर शपथपत्र

**निविदेच्या अटी व शर्ती-**

१. शासन नि. १८.१०.२०१८ मधील परिछद क्र ४;६ मधील तरतुदी नुसार खरेदी मुल्याच्या ३ टक्के इतकी रक्कम DD जिल्हा पुरवठा अधिकारी यांचे नावे जमाकरावी तसेच अनामत रकमेवर केणतेही व्याज देय राहाणार नाही तसेच मंजुर निविदाराकडुन दिलेल्या मुदतीत उचल न झाल्यास अथवा सदर निविदाकाराने निविदेतील अटी व शर्तीचा भंग केल्यास त्याची अनामत रक्कम जप्त करुन सदर निविदाकारास प्रतिबंधीत करण्यात येईल

२. निविदाकाराने निविदेमध्ये स्वतःचे नाव,पत्ता, ई-मेल, दुरध्वनी क्र.नमुद करावे. सोबत सादर करावयाच्या तांत्रिक लिफाफ्यामध्ये संस्था/फर्म असल्यास नोंदणी क्र., पॅन कार्ड क्र., आयकर किंवा GST करदाता असल्यास तसे प्रमाणपत्र, GST क्रमांक इ.बाबींची पूर्तता करणे आवश्यक राहील. अन्यथा निविदा नाकारली जाईल.

३. निविदेतील सर्व अटी व शर्तीना बांधील असे अशा आशयाचे शपथपत्र प्रत्येक रु.१००/- च्या स्टॅम्प सादर करावे.

४. .प्रत्येक तालुक्यासाठी एकच दर राहील. वेगळे दर स्विकारले जाणार नाहीत. तसेच एखादा बारदाना उपयोगी, निरुपयोगी व तुकडा बारदाना आहे किंवा नाही हे ठरविण्याचे अधिकार संबधित तहसिलदार यांना राहतील व त्यांचा निर्णय अंतीम राहील.

५. मंजुरी प्राप्त झाल्यानंतर निविदेतील दरास प्राप्त निविदाधारकास बारदाना उचलीचे आदेश देण्यात येतील या बाबत विलंब झाल्याने बारदाना अधिक खराब झाल्यास त्यांच्या मंजुर दरात कटती केली जाणार नाही.

६. .उपयोगी,निरुपयोगी बारदान्याची नग संख्या व तुकडा बारदानाचे नग संख्या व प्रत्येक गोदामनिहाय दर्शवलेली आहे ती कमी जास्त होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

७. .निविदाधारकाने साठयाचा ताबा घेतल्यानंतर त्यामध्ये काही कमी जास्ती झाल्यास किंवा नुकसान झाल्यास त्याची जबाबदारी शासनावर राहणार नाही.

८. .बारदान्याची प्रत पाहुन व निविदेच्या सर्व अटी याची खात्री करुन निविदा सादर करावी व निविदा उघडल्यानंतर अथवा मंजुर झाल्यानंतर बारदान्यासंबंधी कोणतीही तक्रार ऐकुण घेतली जाणार नाही.

९. .हातची किंमत ही आधारभुत किंमत धरुन जो निविदाधारकास एकुण बारदान्याची जास्त किंमत लावेल त्याचीच निविदा मान्य करण्यात येईल.

१०. एखादया निविदाधारकाने निविदेत दर नमुद केले नसतील तर ती निविदा स्विकारली जाणार नाही. निविदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अथवा मंजुर करण्याचा अधिकार जिल्हाधिकारी उस्मानाबाद यांनी राखुन ठेवला आहे.

११. .बारदान्याची उचल विहित मुदतीत न केल्यास उचलीसाठी लागणा-या अतिरीक्त कालावधीस नियमानुसार गोदामभाडे भरावे लागेल.

१२. मालावर लागू असलेले शासकिय कर, स्थानिक संस्था कर, व इतर अनुषंगीक कर(उदा.व्रिकी कर, आयकर,जकात कर इ.)खरेदीदारास अदा करावी लागेल.

१३. बारदाना मोजून देण्याची जबाबदारी संबंधीत गोदाम व्यवस्थापक/गोदाम किपर यांची आहे. तदनंतरच बारदान उचलण्याचा संपूर्ण खर्च उदा.हमाली,वाराई-भराई इ. खरेदीदारास करावी लागेल.

१४. वित्तीय अधिकारानुसार जर निविदा मंजुरीची बाब ही आयुक्त अथवा शासनाच्या अधिकार क्षेत्रातील असल्यास किंवा इतर प्रशासकिय कारणाने आयुक्त/शासन स्तरावरुन निविदा मंजुरीस विलंब झाला व त्या दरम्यान बारदान्याची पत खराब झाली तर पात्र निविदा काराचे मंजूर दरात कपात केली जाणार नाही. निविदा मंजुर होईपर्यंत उपरोक्त कारणाने होणा-या विलंबाने त्या दरम्यान बारदान्याची पत खराब झाली तर सदर जबाबदारी या कार्यालयाची तसेच शासनाची राहणार नाही.

१५. .शासनाकडुन निविदा मंजुरीच्या प्रस्तावास मान्यता मिळाल्यानंतर इतर निविदाधारकांची इसारा रक्कम परत करण्यात येईल. त्या रक्कमेवर कोणतेही व्याज देय राहणार नाही.

**(श्रीमती स्वाती शेंडे)**
**जिल्हा पुरवठा अधिकारी उस्मानाबाद**

**प्रतिलिपी**

१. **मा. सचिव ,अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग,मंत्रालय मुंबई ३२**

२. **मा. उपआयुक्त पुरवठा औरंगाबाद विभाग यांचेकडे माहितीसाठी अग्रेषित .**

३. **जिल्हा पुरवठा अधिकारी यांचेकडे माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी सादर.**

४. **तहसिलदार यांचेकडे माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी सादर. तसेच उपरोक्त जाहिर निविदा प्रसिध्द करून तसा अहवाल सादर करावा.**

५. **गोदाम व्यवस्थापक /गोदामपाल यांचेकडे माहितीसाठी व निविदा प्रसिध्द करून इच्छुक निविदा धारकास वर दर्शविलेल्या शासकिय गोदामातील बारदाना दाखविण्याची व्यवस्था करावी.**

६. **जिल्हा माहिती अधिकारी ,उस्मानाबाद.**

स्वाक्षरीत

**(श्रीमती स्वाती शेंडे)**
**जिल्हा पुरवठा अधिकारी उस्मानाबाद**